।। सा विद्या या विमुक्तये ।।
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994-Recognized by the UGC U/s 2(f) and 12(b), NAAC Re-accredited with 'B++' Grade

## CONVOCATION SECTION

**Phone: (02462) 229294** **website: srtmun.ac.in** **e-mail: directorboee@gmail.com**

संदर्भ : परीक्षा/दीक्षांत/२०२४–२५/3327 दिनांक : १३/०३/२०२५

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
**मा.संचालक विद्यापीठ संकूले नांदेड परीसर,**
**मा.संचालक उपकेंद्र लातूर, उपपरिसर परभणी ,**

**मा.प्राचार्य न्यु मॉडेल डिग्री कॉलेज,हिंगोली.**
**प्रस्तुत विद्यापीठ**

**विषय : पदवी आवेदनपत्र परीक्षा आवेदनपत्रा सोबत विद्यापीठामध्ये सादर करणे बाबत.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयी विद्यार्थ्याची महाविद्यालयाकडे प्राप्त झालेली पदवी आवेदनपत्र जिल्हानिहाय संकलन केंद्रावर सादर करणे बाबत खालीलप्रमाणे कळविण्यात येते की,

०१) **पदवी आवेदनपत्राची वर्गवारी व यादी** : स्विकारण्यात आलेल्या पदवी आवेदनपत्राचे खालीलप्रमाणे By Hand व By Post चे आवेदनपत्र स्विकारलेले वेगवेगळे स्वतंत्र गठ्ठे तयार करावेत. आवेदनपत्र विद्यार्थ्यांच्या **बैठक क्रमांकानुसार** सादर करणे आवश्यक आहे. आवेदनपत्रावर विद्यार्थ्यांने By Hand/ By Post केलेले पाहून तसे गटटे तयार करावेत. हिवाळी २०२४ परीक्षे पूर्वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र महाविद्यालयात स्विकारु नयेत. तशी अवेदनपत्रे विद्यापीठातच येवून विद्यार्थ्यांने भरणे आवश्यक आहे. आवेदनपत्राची यादी खालील नमुन्यात **(फॉन्ड मराठी वापरावा)** त्याची एक सॉप्ट कॉपी Excel Format मध्ये programmer.mahesh@srtmun.ac.in या मेलवर पाठविण्यात यावी तरच आपले आवेदनपत्र त्या त्या ठिकाणी स्विकारले जातील अन्यथा आपली आवेदनपत्र स्विकारली जाणार नाहीत मेल केल्या नंतर मेल विद्यापीठाला मिळाला आहे काय याची खात्री केल्यानंतरच आपले आवेदनपत्र सादर करावीत. मेल विद्यापीठाला केल्यानंतर त्यामध्ये दुसरी आवेदनपत्र एकत्र करु नयेत. असे झाले तर पदवी प्रमाणपत्र तयार होणार नाही. याची नोंद संबधित महाविद्यालयानी घ्यावी.

| बैठक क्रमांक | विद्यार्थ्यांचे नांव मराठी | ॲपलिकेशन क्रमांक | **पोष्टाने पदवी घेण्यासाठीचे आवेदनपत्र स्विकारले असतील तर त्याच्याच पूढे Yes असे नमुद करावे. बाकी सर्व उपस्थित राहुन पदवी घेण्यासाठीचे आवेदनपत्र समजण्यात येतील.** | विद्यार्थ्यांचा मो.नं व **mail id** | शुल्क रु. |
|---|---|---|---|---|---|

**अ)** उत्तीर्ण वर्ष हिवाळी २०२४ व उन्हाळी २०२५ ची परीक्षा देणारे विद्यार्थाचे महाविद्यालयात उपस्थित राहुन पदवी घेण्यासाठीचे आवेदनपत्र.

**ब)** उत्तीर्ण वर्ष हिवाळी २०२४ व उन्हाळी २०२५ असलेले टपालाने घेण्यासाठी दाखल केलेले आवेदनपत्र.

२) वरीलप्रमाणे वर्गवारी केल्यानंतर अ, ब व क च्या नावाची स्वतंत्रपणे **यादी** तयार करावी, आणि प्रत्येक यादीच्या शेवटी त्यावर प्राचार्याची सही व महाविद्यालयाचा शिक्का असणे आवश्यक आहे.

३) **धनाकर्ष** : परीक्षा आवेदनपत्र घेण्याची तारीख संपल्या नंतर लगेच पाच दीवसाच्या आत D. D. काढावा. किंवा वित्त व लेखाधिकारी,स्वा.रा.ती.म.विद्यापीठ Bank Name, IDBI Bank,Vazirabad Nanded A/C No. 500104000028422 IFSC Code IBKL0000500 यांच्या नावे NEFT द्वारे पेमेंट करण्यात यावे.

**पदवी आवेदनपत्र जमा करावयाचे ठिकाण :**

नांदेड जिल्हा : दीक्षांत कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ येथे, लातूर जिल्हा : विद्यापीठ उपकेंद्र लातूर येथे परभणी जिल्हा : विद्यापीठ उप–परीसर परभणी व न्यू मॉडेल डीग्री कॉलेज, हिंगोली. येथे जमा करावेत. **पदवी आवेदनपत्र जिल्हानिहाय केंद्रावर सादर करणे** : महाविद्यालयांनी सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे महाविद्यालयास परीक्षा आवेदनपत्र जमा करण्यासाठी दिलेल्या तारखेस पदवी आवेदनपत्र लातुर,परभणी व हिंगोली जिल्हयातील महाविद्यालयांनी त्या त्या तारखेलाच जमा करावेत. नांदेड जिल्हयातील सर्व महाविद्यालयांनी पदवी आवेदनपत्र विद्यापीठातील दीक्षान्त कक्षात परीक्षा आवेदन पत्र जमा करण्याच्या दिलेल्या वेळेतच सादर करावेत.

तरी कृपया वरील प्रमाणे नोंद घेवुन कार्यवाही करणे बाबत सर्व संबधिताना कळवावे.

आपला,

प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

टीप : हिवाळी–२०२४ पुर्वीचे पदवी आवेदनपत्र महाविद्यालयांनी स्विकारायचे नाहीत.

प्र. संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रति माहिती व कार्यवाहीस्तव:**

०१ मा.संचालक, सर्व शैक्षणिक संकुल,प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, पदवी आवेदनपत्र दाखल केलेल्या विद्यार्थ्यांची यादी वरील नमुन्यामध्ये वर दिलेल्या मेलवर दीक्षान्त विभागास पाठविणे आवश्यक आहे.

०२. मा. संचालक, उपकेंद्र लातूर व उपपरीसर परभणी,प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, आवेदनत्र दाखल करण्या–या महाविद्यालयांने सर्व आवेदनपत्राच्या यादीची वरील नमुन्याप्रमाणे एक सॉफ्ट कॉपी विद्यापीठाच्या उपरोक्त मेल वर मेल केली का नाही (मेल सेंड केल्याचा मॅसेज दाखविल्यानंतरच) याची खात्री करुनच आवेदनपत्र स्विकारावीत अन्यथा मेल केला नसेल तर त्या महाविद्यालयाचे आवेदनपत्र स्विकारु नयेत.

०३. मा.प्राचार्य, न्यू मॉडेल,डिग्री कॉलेज,हिंगोली प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, पदवी आवेदनपत्र दाखल केलेल्या विद्यार्थ्यांची यादी वरील नमुन्यामध्ये वर दिलेल्या मेलवर दीक्षान्त विभागास पाठविणे आवश्यक आहे.

०४. मा. वित्त व लेखा अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ.